**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.05.2025** **वार- रविवार**

---

<u>मनकीबात</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधला. या कार्यक्रमात ऑपरेशन सिंदूरचं यश, योग दिनाचं महत्त्व, पर्यावरण रक्षण अशा विविध विषयांबरोबरच पंतप्रधानांनी; 20 मे रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक मधमाशी दिनाच्या अनुषंगानं आपले विचार मांडले. मध केवळ गोडवा नाही तर आरोग्य,स्वयंरोजगार आणि स्वावलंबनाचं उदाहरण आहे असं पंतप्रधान म्हणाले. गेल्या ११ वर्षात भारतात मधमाशी पालनात एक मधुर क्रांती घडली असल्याचं त्यांनी सांगितलं. या संदर्भात बोलताना मोदी यांनी पुण्याच्या वारजे परिसरातील अमित गोडसे यांच्या कामाचा आवर्जून उल्लेख केलं. गोडसे यांनी सुरू केलेल्या Urban Bee Rescue नावाच्या स्टार्टअपची पंतप्रधानांनी 'मन की बात' मध्ये दखल घेतली.

<u>कोरोना</u>

गेल्या दोन दिवसांत राज्यात एकंदर 93 नवीन कोविड रुग्ण आढळले आहेत. यापैकी 47 रुग्ण मुंबईत, 30 पुण्यात, 7 नवी मुंबईत, 3 ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आणि 6 नागपूर महानगरपालिका क्षेत्रात आहेत. सध्या राज्यात 166 कोविड रुग्णांवर उपचार सुरू आहेत. कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या

पार्श्वभूमीवर नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करावा, लक्षण आढळून आल्यास तातडीनं तपासणी करावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

महावितरण

राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असल्याने पुणे ‘महावितरण’ च्या कोणत्याही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असा आदेश महावितरणचे अध्यक्ष, आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिला आहे. महावितरणन २४ तास कार्यरत असलेला आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्षही सुरू केला आहे.

रासने

सायबर गुन्ह्यांमधील वाढती संख्या आणि प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता, पुण्यातील सध्याचं एकमेव सायबर पोलीस ठाणं अपुरं पडत असून, पाचही परिमंडळामध्ये प्रत्येकी एक सायबर ठाणं तयार करावं अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी पुण्यात अतिरिक्त पोलिस अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, ई-ऑफिस प्रणालीद्वारे सायबर पोलीस ठाण्यांचे आधुनिकीकरण करावे, प्रशिक्षित मनुष्यबळाची भरती करावी अशा मागण्याही रासने यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात केल्या आहेत.

पावसाळाकामे

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यात नालेसफाईची कामं हाती घ्यावीत, अशी मागणी  शिवसेनेचे पुणे महानगर प्रमुख आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली आहे. नालेसफाईची कामं पारदर्शक पद्धतीने करावीत; अन्यथा पुणे महापालिकेत आंदोलन करू, असा इशाराही धंगेकर यांनी दिला आहे.

जाहिरातफलक

पुणे महापालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागा आणि इमारतींवर आता जाहिरात फलक लावण्यासाठी परवानगी मिळणार आहे. त्यासाठी पाचशेहून अधिक जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. आकाशचिन्ह परवाना विभागानं यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्याचं काम सुरू केलं आहे.

रेल्वे

उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता, मध्य रेल्वेने पुणे आणि दानापूर दरम्यान अतिरिक्त गाडी सोडण्यात येणार आहे. ही गाडी २८ मे आणि १ जून रोजी सोडण्यात येणार आहे.

बाजारसमिती

गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या पावसामुळे पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात फळभाज्यांची आवक घटली आहे. फ्लॉवर, सिमला मिरची, मटार ,टोमॅटो, आले यांचे भाव वधारले आहेत. पालेभाज्याही महागल्या असून विविध फळांचे भावही वधारले आहे. पावसाचा सर्वाधिक फटका फुल बाजाराला बसला असून फुलांचे दरही घटले आहेत. तर चांगल्या प्रतीच्या फुलांना चढा भाव मिळात आहे.

क्रीडा

क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा गौरव क्रीडा भारती या संस्थेच्या वतीने करण्यात येणार आहे. यामध्ये एव्हरेस्ट वीर भूषण हर्षे, कुस्तीगीर अमोल बराटे, कबड्डीपटू आम्रपाली गलांडे यांच्या मातांसह विविध क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या मातांनाही गौरवण्यात येणार आहे. तसंच शरद गोडसे यांना क्रीडा भारती जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केलं जाईल. येत्या 29 मे रोजी क्रीडा भारतीचे अखिल भारतीय महामंत्री राज चौधरी राज्याचे क्रीडामंत्री

दत्तात्रय भरणे आणि गिरिप्रेमी संस्थेचे संस्थापक उमेश झिरपे यांच्या हस्ते पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

<u>हवामान</u>

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान आहे. आज कमाल तापमान 28 तर किमान तापमान 22 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही दिवसभर ढगाळ हवामानासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**